**नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १७४/२०२० मधील**
**निशाण २८० वरील आदेश**

**१.** अर्ज व म्हणणे वाचले.

**२.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

**३.** उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

**४.** वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.१इ हे दि.१८.०४.२०२० रोजी मयत झाले आहेत. परंतु, ते उद्योगधंद्यानिमित्त परराज्यात वास्तव्यास असल्याने तसेच दरम्यानचे काळात कोरोना महामारीमुळे संपूर्ण देशात लॉकडाऊन असल्यामुळे त्यांचेकडून प्रतिवादी क्र.१इ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी विलंब झाला आहे. वादी यांनी ही कथने अर्जाचे पृष्ठयर्थ ॲफिडेव्हीट सादर करुन शपथेवर केली आहेत. प्रतिवादी क्र.१इ हे लॉकडाऊनच्या काळात मयत झाल्याचे दिसून येते. त्यामुळे, वादी यांनी दिलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी दावा मिळकतींचे सरस-निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी हा दावा दाखल केला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१इ यांचे वारसांविरुध्द दाव्याचे कारण पुढे चालू राहते. सबब, या कामी प्रतिवादी क्र.१इ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला १६८ दिवसांचा विलंब माफ होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

१. वादी यांचा निशाण २८० वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.१इ चे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला १६८ दिवसांचा विलंब माफ करणेत येत आहे.

-

Digitally signed by Dhiraj Maruti Hinglajkar
Date: 2021.03.23 17:54:28 +0530

**दिनांक २०.०३.२०२१.** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः विटा.** **३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,विटा,**
**ता. खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCS. No. 174 of 2020
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Stenographer:V.A.Mane
Court Name: 3rd Joint Civil & Criminal Court, Vita, Dist.Sangli.
Date of decision : 20.03.2021
Order signed by P.O.on : 20.03.2021
Order uploaded on : 22.03.2021